## महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.३०३/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२२.

प्रति,

अपर मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना राज्य मार्ग- ५४, भिगवण ते बारामती या रस्त्याच्या कामाकरीता ता. इंदापूर व ता. बारामती, जि.पुणे येथील ०.९४ हे. वनजमीन वळती करणेबाबत...

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/ पुणे /ID-१३०१६(२४) /१५३८/२०२२-२३,दि. २०.०९.२०२२.

संदर्भाधीन दिनांक २७.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना राज्य मार्ग- ५४, भिगवण ते बारामती या रस्त्याच्या कामाकरीता ता. इंदापूर व ता. बारामती, जि.पुणे येथील ०.९४ हे. वनजमीन वळतीकरणेबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

२. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली नमूद मुद्यांची माहिती शासनास तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

(१) प्रकल्पासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे बांबावाडी, गट नं. ३६३ व ३५८ आणि मौजे पिंपळे, गट नं. १४ आणि १५, येथील जमिनीचे ७/१२ उतारे सादर करावेत.

(२) प्रकल्पासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्राची KML File चे अवलोकन केले असता, त्यामध्ये रस्त्याचा क्र: रा.मा. ६८ दिसत असून, प्रस्तावित रस्त्याचा क्र. ५४ आहे. सबब, प्रस्तावित रस्ता व KML File मधील रस्ता एकच आहे किंवा कसे ? असल्यास, त्याप्रमाणे KML File मध्ये सुधारणा करावी.

(३) प्रस्तावित वन जमिनीची सर्व सेक्शन (Section) KML File मध्ये वेगवेगळे सादर केले आहेत. सदर सर्व सेक्शन (Section) एकाच KML मध्ये दर्शवून, सुधारित KML File सादर करावी.

(४) प्रस्तावित रस्त्याच्या पुढील व मागील रस्त्याच्या कामाचा उल्लेख प्रस्तावित दिसत नाही. त्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर केले आहेत काय ? असल्यास, त्यामध्ये वनक्षेत्राचा समावेश आहे काय ? याबाबतची माहिती सादर करावी.

(५) प्रकल्प यंत्रणेने सादर केलेला ऑनलाईन पार्ट-१ अर्ज सादर करावा.

(६) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित क्षेत्राचा ७/१२ उतारा सादर करावा.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी :-

मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे
उपवनसंरक्षक, पुणे
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे